आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
११ फेब्रुवारी २०२५ मंगळवार

**ठळक बातम्या**

- कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्राचा जबाबदारीनं वापर आणि नियमनासाठी जागतिक पातळीवर एकत्रित प्रयत्नांची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून व्यक्त
- देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग जगात सर्वाधिक ठेवण्यासाठी सर्व उपाययोजना करण्याची, अर्थसंकल्पावरच्या चर्चेवर अर्थमंत्र्यांची ग्वाही
- दहावी- बारावी परीक्षेत सामूहिक कॉपी होणाऱ्या केंद्राची मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबई, विदर्भ आणि गुजरात उपांत्य फेरीत

**<><><><><>**

AI अर्थात कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्राचा जबाबदारीनं वापर आणि नियमन यासाठी जागतिक पातळीवर एकत्रितरित्या प्रयत्न करण्याची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केली. पॅरिसमध्ये AI कृती परिषदेत सह अध्यक्षपदावरुन ते संबोधित करत होते. सह अध्यक्ष फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष एमॅन्युएल मॅक्रॉन यावेळी उपस्थित होते. या तंत्रज्ञानाचं भविष्य यंत्र नव्हे तर मानवाच्या हातात आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाचा विकास जबाबदारी, सामाजिक आणि नैतिक हित ध्यानात ठेवून होईल, याकडे लक्ष देण्याचं आवाहन त्यांनी उपस्थितांना केलं.

शिक्षण, आरोग्य, कृषी यासारख्या अनेक क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवण्याची क्षमता या तंत्रज्ञानात आहे. त्यासाठी या तंत्रज्ञानाचं लोकशाहीकरण,

लोकाभिमुखपणा आणि जगातल्या कमी विकसित देशांनाही याचा लाभ मिळेल, याकडे लक्ष देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. या क्षेत्रात भारतानं घेतलेल्या आघाडीची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली. देशाच्या भाषिक आणि सांस्कृतिक गरजा लक्षात घेऊन भारत स्वतःचं Large language model विकसित करतो आहे. पीपीपी तत्त्वावर हे सुरू असल्याचं ते म्हणाले. या परिषदेदरम्यान प्रधानमंत्र्यांनी इस्टोनियाचे अध्यक्ष अलार कारिस यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही देशांमधले परस्पर संबंध बळकट करण्यावर चर्चा झाली.

**<><><><><>**

युनानी उपचारपद्धतीतलं शिक्षण, संशोधन, आरोग्यसेवा आणि औषधांचं उत्पादन या क्षेत्रांमध्ये भारतानं जागतिक पातळीवर मोठी आघाडी घेतली आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. युनानी दिनाच्या निमित्ताने नवी दिल्ली इथं दोन दिवसांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. युनानी आणि इतर भारतीय उपचारपद्धतींचा विकास करायला सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली.

**<><><><><>**

देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग जगात सर्वाधिक राहील, यासाठी केंद्र सरकार सर्व उपाययोजना करेल, असं आश्वासन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिलं. लोकसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देताना त्या बोलत होत्या. सरकारकडून घेतलं जाणारं ९९ टक्के कर्ज हे भांडवल निर्मितीसाठी खर्च होत आहे. चलनवाढीचा दर २ ते ६ टक्क्यांच्या दरम्यान

ठेवण्यावर सरकारचा भर आहे, असं त्या म्हणाल्या. रुपयाच्या घसरणीला जागतिक आणि देशांतर्गत बाजारपेठेतले अनेक घटक कारणीभूत असल्याचं त्यांनी सांगितलं. दक्षिण कोरिया, इंडोनेशिया यासारख्या इतर आशियाई देशांच्या चलनाच्या तुलनेत रुपयाची घसरण कमी असल्याचं त्या म्हणाल्या. केंद्रीय अर्थसंकल्पात विकास आणि वित्तीय प्राधान्य यांचा समतोल साधण्यात आला असल्याचं प्रतिपादनही सीतारामन यांनी केलं.

देशाला प्रगतीची आणि विकासाची नवी दालनं खुली करून देणारा हा अर्थसंकल्प असल्याची प्रशंसा शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी केली. खासदार सुप्रिया सुळे यांनी 'विकसित भारत' या कल्पनेची प्रशंसा केली. पण, सरकारला देशाच्या आजच्या आर्थिक स्थितीची जाणीव असायला हवी, असं त्या म्हणाल्या. अमेरिकेच्या सत्तांतरानंतर इतर बहुतेक देशांची चलनं स्थिर झाली असली तरी रुपयाचं अवमूल्यन सुरू असून तो आता ८७ रुपयांवर गेला आहे. याचं उत्तर सरकारनं द्यावं, अशी मागणी सुळे यांनी यावेळी केली.

यानंतर लोकसभेचं कामकाज गुरुवारपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्यसभेत आज २०२५-२६च्या अर्थसंकल्पावर चर्चा पुन्हा सुरू झाली. सरकारने घेतलेल्या सक्रिय उपाययोजनांमुळे राजकोषीय तूट चार दशांश टक्क्याने कमी झाल्याचं भाजप खासदार भागवत कराड या चर्चेवेळी म्हणाले. मजबूत पायाभूत सुविधा आणि इतर क्षेत्रांमध्ये देशाने लक्षणीय प्रगती पाहिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली येत्या

काळात देश जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी व्यक्त केला.
केंद्रीय अर्थसंकल्पात शिक्षणासाठीची तरतूद फक्त सात टक्के वाढवण्याबद्दल अपक्ष खासदार कपिल सिब्बल यांनी नाराजी व्यक्त केली. शिक्षण आणि आरोग्य या दोन महत्त्वाच्या क्षेत्रांकडे सरकारने पुरेसं लक्ष दिलं नाही, असा आरोपही सिब्बल यांनी केला. देशातल्या ७० टक्के नागरिकांसाठी आखलेल्या कल्याणकारी योजना प्रत्यक्षात अंमलात आणल्या जात नाहीत, अशी टीका काँग्रेसचे खासदार चंद्रकांत हंडोरे यांनी केली. तृणमूल काँग्रेसच्या खासदार डोला सेन यांनी १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर करसवलत देण्याच्या निर्णयाचं स्वागतं केलं. मात्र, देशातली ९० टक्के जनता १० ते २० हजार रुपये प्रतिमहिना कमावते, त्यांच्यासाठी अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद नसल्याचा आरोप सेन यांनी केला.

२०२५-२६ च्या अर्थसंकल्पात महिलांच्या कल्याणासाठी ४ लाख कोटींहून अधिक रकमेची विक्रमी तरतूद करण्यात आली आहे. गेल्या अर्थसंकल्पाच्या तुलनेने ही वाढ ३७ टक्क्याहून जास्त आहे, अशी माहिती महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी नवी दिल्लीत माध्यमांशी बोलताना दिली. येत्या १८ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत सातव्या पोषण पंधरवड्याची घोषणाही अन्नपूर्णा देवी यांनी केली.

**<><><><><>**

तटरक्षक दलाचे माजी महासंचालक के नटराजन यांच्याविरुद्ध सीबीआयने एफआयआर दाखल केला आहे. तटरक्षक दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या

गोपनीय अहवालात छेडछाड केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. संरक्षण मंत्रालयाने पाठवलेल्या निवेदनावरुन सीबीआयने गेल्या वर्षी एप्रिलमधे प्राथमिक चौकशी सुरु केली.

**<><><><><>**

दहावी- बारावी परीक्षेत सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार आढळल्यास त्या केंद्राची मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले आहेत. तसंच कॉपीसाठी मदत करणाऱ्या, शिक्षक कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश ही त्यांनी दिले. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज त्यांनी राज्यातल्या सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकाऱ्यांशी परीक्षेच्या तयारी बाबत आणि कार्यवाही करण्याबाबत संवाद साधला. परीक्षा केंद्राच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी आणि भरारी पथक, ड्रोन आणि व्हिडीओ कॅमेरांद्वारे नजर ठेवण्याच्या अशा सूचना त्यांनी दिल्या.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात आज नक्षलवाद्यांशी झालेल्या चकमकीत एक जवान शहीद झाला. भामरागड तालुक्यातल्या दिरंगी आणि फुलणार गावांच्या जंगलात सुरक्षा दलानी काल नक्षलविरोधी अभियान सुरु केलं होतं. या अभियानादरम्यान पोलिसांनी नक्षलवाद्यांचा तळ उद्ध्वस्त केला असून, नक्षल साहित्य ताब्यात घेतलं आहे.

**<><><><><>**

जम्मू जिल्ह्यात अखनूर भागात बॉम्बस्फोटात लष्कराच्या २ जवानांचा मृत्यू झाला. याप्रकरणी सैन्य दलानं शोध मोहिम हाती घेतली आहे.

**<><><><><>**

लोकप्रिय समाजमाध्यम असलेल्या इन्स्टाग्रामवर आता किशोरवयीन मुलांच्या सुरक्षेसाठीचे अधिक पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी घोषणा मेटा या कंपनीने केली आहे. अनावश्यक मेसेजेस रोखणं, गोपनीयता राखण्यासाठी अधिक पर्याय, पालकांना अकाउंटवर देखरेख करण्याची सुविधा यांचा यात समावेश असेल. १६ वर्षं वयापेक्षा कमी असलेल्या युजर्सचा वावर अधिक सुरक्षित करण्याकडे मेटाचं प्राधान्य असेल. अशा युजर्सच्या अकाउंटवर पालकांना नियंत्रण ठेवता येईल, तसंच ॲपच्या वापराचा वेळही पालकांना निश्चित करता येणार आहे.

**<><><><><>**

स्वित्झर्लंडमधल्या दावोस इथं झालेल्या जागतिक आर्थिक गुंतवणूक परिषदेच्या धर्तीवर वेव्ह्ज २०२५ ही परिषद मनोरंजन क्षेत्रातली जागतिक परिषद ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज व्यक्त केला. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्यासह इतरांशी मुंबईत मंत्रालयात आज यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यासाठी राज्य शासनाकडून आणि मुख्यमंत्री कार्यालयाकडून प्रत्येकी एका अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबई आणि विदर्भानं उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. कोलकाता इथं झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात, मुंबईनं आज

हरयाणावर १५२ धावांनी विजय मिळवला. मुंबईनं पहिल्या डावात ३१५, तर दुसऱ्या डावात ३३९ धावा केल्या. दुसऱ्या डावात आज कर्णधार अजिंक्य रहाणेनं १०८ धावा केल्या. हरयाणानं पहिल्या डावात ३०१ धावा केल्या होत्या. मात्र त्यांचा दुसरा डाव २०१ धावात आटोपला.

नागपुरात झालेल्या दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात, विदर्भानं तामीळनाडूवर १९८ धावांनी मात केली. विदर्भानं पहिल्या डावात करुण नायरच्या शतकी खेळीच्या जोरावर ३५३, तर दुसऱ्या डावात यश राठोडच्या शतकामुळे २७२ धावांची मजला मारली. तामीळनाडूनं पहिल्या डावात २२५, तर दुसऱ्या डावात २०२ धावा केल्या.

राजकोट इथं झालेल्या चौथ्या उपांत्यपूर्व सामन्यात गुजरातनं सौराष्ट्रावर १ डाव आणि ९८ धावांनी विजय मिळवत उपांत्यफेरी गाठली. पहिल्या डावात सौराष्ट्रानं २१६ , तर गुजरातनं ५११ धावा केल्या होत्या. गुजरातच्या उर्विल पटेलनं १४० जयमित पटेलनं १०३ धावा केल्या होत्या. मनन हिंगराज यानं ८३ धावांचं योगदान दिलं. सौराष्ट्राचा दुसरा डाव आज १९७ धावांवर आटोपला. गुजराततर्फे प्रियजीतसिंग जडेजानं ४ गडी बाद केले.

//<><><><><>//